# ३. कौशल्याधिष्ठित उपक्रम

## (अ) नैसर्गिक वस्तूंचे ठसे







### माझी कृती

फळभाज्यांचे काप, पाने, बिया इत्यादी नैसर्गिक वस्तू त्याचबरोबर हातांच्या बोटांना रंग अथवा शाई लावून बोटांचे ठसे द्यावेत.

R84G9A

विद्यार्थ्यांना चित्रातील ठसे कोणत्या वस्तूचे आहेत ते ओळखायला सांगावे. त्यांना रिकाम्या चौकोनात विविध वस्तू अथवा हाताचे ठसे द्यायला सांगावे. सौंदर्याकृती तयार करून घ्यावी.

## (ब) कागदी पंखा तयार करणे.



वर्तमानपत्राचा/मासिकाचा कागद घ्यावा. उलटसुलट घड्या घालाव्या. घड्या पूर्ण झाल्यावर मधोमध दुमडावे. आतील बाजूच्या पट्ट्यांवर डिंक लावून चिकटवावे. बाहेरील बाजूच्या पट्ट्यांना डिंकाच्या साहाय्याने आईस्क्रीमच्या/बांबूच्या काड्या चिकटवाव्या. चिकटवलेला भाग नीट सुकू द्यावा व नंतरच पंखा उघडावा.